# शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

जलंब रोड, खामगांव-444303, जि. बुलडाणा (महाराष्ट्र राज्य)
Phone No.- (07263) 252278,256644 E-mail:- office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in

**महत्वाची सूचना**

क्र : शातनिखा/शिष्यवृत्ती/सवलत/2021/2071
दिनांक : 16/11/2021

**विषय : शैक्षणिक वर्ष 2020-21 करीता अद्यापपर्यंत शिष्यवृत्ती व निर्वाह भत्त्याकरीता अर्ज न केलेल्या विदयार्थ्यांबाबत.**

वरील विषयानुसार संस्थेतील **द्वितीय वर्ष / थेट द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष प्रवेशित** सर्व शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, या आधी संस्थेच्या सूचना फलकावर शिष्यवृत्तीबाबत वारंवार सूचना लावण्यात आल्या तसेच वर्ग खोलीमध्ये मौखीक रित्या सुध्दा सूचना देण्यात आल्या. तरी शैक्षणिक वर्ष 2020-21 करीता **अद्यापही काही विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती व निर्वाह भत्त्याकरीता (Maintenance Allowance) अर्ज केलेले नाहीत.** अशा विदयार्थ्यांनी आपापल्या प्रवर्गानूसार (SC, VJNT, SBC, OPEN) त्वरीत शिष्यवृत्ती व **निर्वाह भत्त्याकरीता स्वतंत्र ऑनलाईन अर्ज करावा** व तो अर्ज तसेच (या आधी लावण्यात आलेल्या शिष्यवृत्तीसंबंधीत सूचनांनूसार) सर्व आवश्यक कागदपत्रांचा एक झेरॉक्स सेट संस्थेच्या शिष्यवृत्ती विभागात **दिनांक 30 नोव्हेंबर 2021 पर्यंत जमा करावा.**

तसेच या आधीच्या सूचनेप्रमाणे संस्थेच्या वसतीगृहामध्ये (Hostel) राहणा-या व निर्वाह भत्त्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी **Hostel Non-Government** निवडावे व त्यांनी वसतीगृह शुल्काची पावती **(Hostel Fee Receipt)** व वार्डन यांचे पत्र **(Warden Letter)** शिष्यवृत्तीचा अर्ज भरतेवेळी अपलोड करावे व त्याची झेरॉक्स प्रत इतर कागदपत्रांसह अर्जाला जोडावी आणि शिष्यवृत्ती अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रांचा एक झेरॉक्स सेट संस्थेच्या शिष्यवृत्ती विभागात विहीत कालावधीत त्वरीत जमा करावा.

जे विद्यार्थी शिष्यवृत्ती व तत्सम अर्ज विहीत कालावधीत भरणार नाहीत, त्यांना संस्थेत पूर्ण शुल्क भरावे लागेल व त्यास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**टिप : ;TFWS, Against Cap) या अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना कुठलीही शिष्यवृत्ती लागू नसल्यामुळे अशा विदयार्थ्यांनी शिष्यवृत्तीकरीता अर्ज करु नये.**

16/11.

(डॉ.एस.एस.प्रभुणे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन खामगांव

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव -

1. मुख्य सुचना फलक.
2. मुलांचे व मुलींचे वसतीगृहातील सूचना फलक.
3. ग्रंथालय सूचना फलक.
4. सर्व विभाग प्रमुख - संगणक अभि./अणुविदयुत अभि./विदयुत अभि./स्थापत्य अभि./यंत्र अभि./उपयोजित यंत्रशास्त्र/विज्ञान व मानव्यशास्त्र विभाग/कर्मशाळा विभाग.
5. प्रोग्रामर संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.